आरबीआय/२००७-०८/६०

डीसीएम (एनई) नं. ७/०८.०७.१८/२००७-०८
जुलै २, २००७

सर्व सरकारी क्षेत्रातील व खाजगी क्षेत्रातील बँका,
विदेशी बँका आणि राज्य सहकारी बँकांचे
चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर

महोदया / महोदय

**मुख्य परिपत्रक - नोटा व नाणी बदलून देण्याची सुविधा**

डीसीएम (एनई) नं. जी-२/०८.०७.१८/२००२-०३ दिनांक ०५ जुलै, २००२.च्या नोटा व नाणी बदलून देण्याच्या सुविधेशी संबंधीत, यापूर्वीच्या मुख्य परिपत्रकातील तरतुदींमध्ये करण्यात आलेल्या बदलांनंतर, विषयावरील सुधारित महापरिपत्रक, माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी आपणाकडे निर्गमित करण्यात येत आहे.

महापरिपत्रक आमच्या www.rbi.org.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

आपला विश्वासु

(यु. एस. पालीवाल)
मुख्य महाव्यवस्थापक

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट रिफंड) नियम, १९७५ (१९८० पर्यंत सुधारल्यानुसार)- शक्तीचे प्रत्यायोजन**

१ (अ). रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्ट १९३४ च्या कलम ५८(२) सह वाचावयाच्या कलम २८ नुसार कोणासही किंवा कोणत्याही व्यक्तीस, हरविलेल्या, फाटलेल्या, नष्ट केलेल्या अथवा अप्रमाणित भारतीय चलन अथवा बँक नोटांचे मूल्य, भारत सरकार अथवा रिझर्व्ह बँकेकडून हक्क म्हणून वसूल करता येणार नाही. तथापि, प्रामाणिक प्रकरणात जनतेला होणारा त्रास कमी करण्याच्या दृष्टीने, आरबीआय केंद्र सरकारच्या पूर्वमंजूरीने, परिस्थिती, अटी आणि मर्यादा विहीत करील ज्याच्या अधीन अशा चलनी नोटा किंवा बँक नोटांचे मूल्य अनुग्रहाची बाब म्हणून परत करण्यात येईल.

(ब) ही सुविधा जनतेच्या फायद्यासाठी आणि सोयीसाठी देण्याच्या दृष्टीने, सर्व करन्सी चेस्ट शाखांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोटा परतावा) नियम, १९७५(१९८० पर्यंत सुधारल्याप्रमाणे) अधीन फाटलेल्या/खराब झालेल्या/सदोष नोटा बदलून देण्यासाठी शक्तिचे प्रत्ययोजन करण्यात आले आहे.

**तुकडे झालेल्या नोटांची उदार केलेली व्याख्या**

२. जलद बदल करणे सुलभ व्हावे ह्या दृष्टीने, खालील प्रकारच्या खराब आणि तुकडे पडलेल्या नोटा सर्व बँक शाखांनी मुक्तपणे बदलून द्याव्यात. सरकारी देय रकमांच्या प्रदानासाठी आणि बँकेंमध्ये असलेल्या सार्वजनिक खात्यात जमा करण्यासाठी सुद्धा त्या बँकेच्या कक्षात स्वीकारण्यात याव्यात.

१. <u>एक संख्यांकित नोटा - रु. १/-, रु. २/-, रु. ५/-</u>

सादर केलेल्या नोटा दोनहून अधिक तुकड्यात नसाव्यात. नोटेची महत्त्वाची वैशिष्ट्ये गहाळ नसावीत आणि एका तुकड्याच्या अविभाजित भागावर संपूर्ण क्रमांक उपलब्ध असावा.

२. <u>दुहेरी संख्यांकित नोटा - रु. १०/-, रु. २०/-, रु.५०/- रु. १००/-, रु. ५००/-, रु. १०००/-,</u>

सादर केलेल्या नोटा दोनहून अधिक तुकड्यात नसाव्यात. नोटेची महत्त्वाची वैशिष्ट्ये गहाळ नसावीत. दोन्ही तुकडे एकाच नोटेचे असावेत, म्हणजेच प्रत्येक तुकड्यावरील अविभााजित भागातील क्रमांक एकसमान असावा.

उपरोल्लेखित नोटा या खराब नोटा म्हणून ओळखण्यात याव्यात. व खराब नोटांबरोबर ठेवण्यात याव्यात. या अपात्र नोटा कोणत्याहि परिस्थितीत जनतेला पुन्हा वापरण्यासारख्या म्हणून देण्यात येऊ नयेत तर त्या बदलण्याकरीता आरबीआय ऑफिसकडे पाठविण्यासाठी, चलन पुरवठा शाखेकडे (करन्सी चेस्ट ब्रॅन्च) भरण्यात याव्यात.

अत्यंत जीर्ण, फारच जळालेल्या राख झालेल्या, घट्ट चिकटलेल्या अशा नोटा, की ज्या सामान्यपणे हाताळता येणार नाहीत, या नोटा बदलून देता येणार नाहीत. अशा नोटा धारण करणाऱ्यांना, संबंधित इश्यु ऑफिसकडे सदर नोटा जमा करण्यास सांगावे. वेगळ्या प्रक्रियेने त्यांची अडचण सोडविण्यात येईल.

**खराब नोटा - सादर करणे आणि पारित करणे**

३. खराब नोट म्हणजे अशी नोट जिचा एखादा भाग गहाळ आहे किंवा जी तुकड्यांनी बनलेली आहे. खराब नोटा एकतर रिझर्व्ह बँकेच्या निर्गम कार्यालयात किंवा व्यावसायिक बँकांच्या निर्धारित शाखात सादर कराव्यात. अशा सादर केलेल्या नोटा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया(नोटा परतावा) नियम, १९७५ (१९८० पर्यंत सुधारल्याप्रमाणे). जो आरबीआयच्या www.rbi.org.in वर उपलब्ध आहे, अधीन घालून दिलेल्या नियमांनुसार पारित करण्यात याव्यात

**अत्यंत ठिसूळ, जळलेल्या, कोळसा झालेल्या, चिकटलेल्या नोटा**

४. ज्या नोटा अतिशय ठिसूळ झालेल्या आहेत किंवा वाईटरित्या जळलेल्या आहेत, कोळसा झाल्या आहेत, किंवा वेगळ्या न करता येण्याएवढ्या चिकटल्या आहेत आणि त्यामुले सामान्य हाताळणीत त्या टिकू शकत नाहीत, त्या शाखानी बदलण्यासाठी स्वीकारू नयेत. त्याऐवजी धारकाला त्या संबंधित निर्गम कार्यालयात सादर करण्यास सांगावे जेथे त्या विशेष कार्यपद्धतीअधीन अभिनिर्णीत केल्या जातील.

**"पे" / "पेड" "रिजेक्ट" शिक्के धारण करणाऱ्या नोटा**

५. प्रत्येक शाखेचा प्रभारी अधिकारी म्हणजेच शाखेचा लेखा किंवा रोकड विभागाचा प्रभारी अधिकारी, शाखेत आरबीआय (नोट परतावा) नियम १९७५ (१९८० पर्यंत केलेल्या दुरुस्त्यांप्रमाणे) अधीन बदलण्यासाठी प्राप्त झालेल्या नोटांच्या अभिनिर्णयासाठी प्रत्येक शाखेत 'विहीत अधिकारी' काम करील.खराब नोटांच्या अभिनिर्णयानंतर, सदर नोटेवर विहीत अधिकारी, तारखेसह, पे/पेड/रिजेक्ट चा शिक्का मारुन त्यावर आपली अद्याक्षरे लिहितील. पे व रिजेक्टच्या शिक्क्यांवर बँकेचे, शाखेचे नाव असणे बंधनकारक आहे. आरबीआयच्या निर्गम शाखेचा, किंवा कोणत्याही बँकेच्या शाखेचा पे/पेड (किंवा रिजेक्ट) चा शिक्का असलेल्या सदोष नोटा जर निर्देशित बँकांच्या शाखांमध्ये पुन्हा सादर करण्यात आल्या तर, त्या आरबीआय (नोट रिफंड) नियम ५(१) प्रमाणे स्वीकारण्यात येऊ नयेत. त्याचबरोबर नोट सादर करणाऱ्याच्या निदर्शनास आणून देण्यात यावे की, ज्याअर्थी सदर नोटेवर पे/पेड चा शिक्का मारण्यात आलेला आहे त्याअ अर्थी, सदर नोटेची भरपाई करण्यात आली आहे. चुकुनहि पे/पेड शिक्का असलेल्या नोटा नागरिकांना वितरित न करण्याच्या सुचना सर्व बँक शाखांना देण्यात आलेल्या आहेत.

शाखांनीहि आपल्या ग्राहकांना, कोणत्याही बँकेकडून किंवा कोणाकडूनही अशा नोटा न स्वीकारण्याविषयी सावध करावे.

**घोषणा/राजकीय संदेश वगैरे धारण करणाऱ्या नोटा**

६. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट परतावा) नियम, १९७५ (१९८० पर्यंत सुधारल्याप्रमाणे) च्या नियम ५(२) अधीन घोषणा किंवा राजकीय स्वरुपाचा संदेश लिहिला असल्यास नोटेचे कायदेशीर अस्तित्व नष्ट होते आणि अशा नोटेच्या बदलीची मागणी फेटाळण्यात येते. त्याचप्रमाणे अप्रमाणित नोटांची बदलीची मागणीही उपरोल्लेखित रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट परतावा) नियम, १९७५ (१९८० पर्यंत सुधारल्याप्रमाणे) च्या नियम ५(२) अधीन फेटाळण्यात येते.

## जाणूनबुजून कापलेल्या नोटा

७. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट परतावा) नियम, १९७५ (१९८० पर्यंत सुधारल्याप्रमाणे) च्या नियम ५(२) (!!) अधीन, जाणीवपूर्वक कापलेल्या किंवा छेडछाड केलेल्या नोटा त्यांच्या चलन मूल्याच्या प्रदानासाठी सादर केल्यास त्या फेटाळण्यात याव्यात. जाणीवपूर्वक नोट खराब केलेली/खराब केलेली नोट नेमकेपणे ठरवणे शक्य नसले तरी, बारकाईने तपासल्यास, नोटेची खराबी करण्यामागे घोटाळ्याचा उद्देश आहे काय हे उघड होऊ शकेल, कारण ज्या पध्दतीने ह्या नोटा खराब केल्या जातात त्यामध्ये नोटेच्या गहाळ भागाच्या आकारात / स्थानात असाधारण साधर्म्य अनुसरण्यात येईल. अशा प्रकरणात, नोटा सादर करणाऱ्याचे नाव, नोटांचे क्रमांक, त्यांचे दर्शनी मुल्य आदी तपशील संबंधित बँक ज्या निर्गम विभागाच्या कार्यक्षेत्रात येते त्या विभागाच्या उप/महाव्यवस्थापक यांना सादर करण्यात यावा. जाणीवपूर्वक मोठ्या प्रमाणात नोटा खराब केल्या असल्यास, स्थानिक पोलिसांना कळवण्यात यावे. खराब नोटांच्या संदर्भात खाजगी चलन बदली करणारे/ व्यावसायिक, बदली सुविधेचा गैरफायदा घेत नाहीत याची शाखांनी खात्री करुन घ्यावी.

## प्रशिक्षण

८ चलन पुरवठा शाखांच्या (करन्सी चेस्ट ब्रॅन्च) “विहीत अधिकाऱ्यां” साठी प्राथमिकतेच्या तत्त्वावर प्रशिक्षणाचे कार्यक्रम घेण्याच्या सूचना आमच्या निर्गम कार्यालयांना देण्यात आलेल्या आहेत. विहीत अधिकारी म्हणून काम पाहणाऱ्याच अधिकाऱ्यानाच केवळ प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येईल याची खात्री करावी. प्रशिक्षणामध्ये खराब नोटांची आत्मविश्वासाने पडताळणी करण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि कायदेशीर प्रक्रियेची माहिती देण्यात येत असल्याने, विहीत अधिकारी म्हणून काम करणाऱ्यांनी हे प्रशिक्षण पूर्ण करणे गरजेचे आहे.

## सूचना फलकावर प्रदर्शन

९. सर्व निर्धारित बँक शाखांनी आपल्या शाखेत “खराब नोटा स्वीकारल्या जातील व बदलून मिळतील” असे लिहीलेला नोटा बदलून देण्याच्या सुविधेची उपलब्धता दर्शवणारा फलक महत्त्वाच्या जागी प्रदर्शित करणे आवश्यक आहे. बँकांनी आपल्या सर्व निर्धारित शाखा नोटा बदलून देण्याचा व्यवसाय हाती घेत आहेत याची खात्री करावी.

## रु. १०००/- मूल्याच्या नोटेचा आरंभ

१०. रु. १०००/- ची बँकनोट सुरू झाल्यावर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट परतावा) नियम, १९७५ (१९८० पर्यंत सुधारल्याप्रमाणे) मध्ये ज्या ज्या ठिकाणी ‘पाचशे रुपये’ असा उल्लेख आला आहे, त्या त्या ठिकाणी ‘एक हजार रुपये’ असा बदल करण्यात आला आहे. व ‘१०००’ हा आकडा ‘५००’ या आकड्याच्यापुढे जोडण्यात आला आहे. उक्तचा परिणाम असा आहे कि रु. ५००/- पर्यंतच्या मूल्याच्या दुहेरी संख्यांकित नोटाना जे नियम लागू होते ते आता रु.१०००/- मूल्याच्या नोटा बदलण्यासाठीही लागू आहेत. अशाप्रकारे, रु.१०००/- नोटासुध्दा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट परतावा) नियम, १९७५ (१९८० पर्यंत सुधारल्याप्रमाणे) अधीन रु. १०/-, रु. २०/-, रु.५०/-, रु. १००/-, रु.५००/- च्या नोटा ज्या पध्दतीने अभिनिर्णीत केल्या जातात त्याच पद्धतीने अभिनिर्णीत केल्या जातील.

**करन्सी चेस्टमध्ये अभिनिर्णीत नोटांची विल्हेवाट**

११. चलन पुरवठा शाखांमध्ये, निर्गम कार्यालयाच्या आधिकारितेत अभिनिर्णीत नोटांच्या लेखापरिक्षणाच्या बाबतीत, पूर्ण मुल्य परतावा झालेल्या चलनी नोटा, चलन पुरवठा शाखांनी आधीच ठरवून दिलेल्या पद्धतीने पुढच्या खराब नोट प्रेषणासमवेत वित्तप्रेषित केल्या पाहिजत. चलन पुरवठा शाखेने रोख शिलकीत धारण केलेल्या, अर्धमुल्य परताव्याच्या व नाकारलेल्या नोटा, निर्गम कार्यालयाकडे पूर्ण परताव्याच्या नोटांच्या बंडलांबरोबरच वेगळे बंडल बांधून दोन्ही एकत्र सादर करता येतील किंवा, विमा संरक्षित टपालाद्वारे आवश्यक त्याप्रमाणे पाठवून देता येतील. पूर्ण परताव्याच्या नोटा, निर्गम कार्यालयाद्वारे चलन वित्तप्रेषण म्हणून समजण्यात येतील. तर अर्ध मूल्य प्रदान केलेल्या आणि फेटाळलेल्या नोटा अभिनिर्णायासाठी सादर केलेल्या नोटा समजण्यात येतील आणि त्याप्रमाणे त्यांची प्रक्रिया करण्यात येईल. सर्व चलन पुरवठा शाखांनी आमच्या निर्गम कार्यालयाला त्यांनी अभिनिर्णीत केलेल्या नोटांचे मासिक विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**बँक शाखांमध्ये नोटा आणि नाणी बदलण्यासाठी सुविधा**

१२(अ) देशाच्या सर्व भागातील सर्व बँक शाखांनी, पुढील सेवा नागरिकांना पुरविण्याकामी तत्पर व कटिबद्ध राहिले पाहिजे. जेणेकरुन केवळ या कारणासाठी, नागरिकांना रिझर्व्ह बँकेच्या विभागीय कार्यालयांकडे जाण्याची गरज राहणार नाही.

(१) सर्व मूल्यांच्या नवीन /चांगल्या दर्जाच्या नोटा व नाण्यांचा मागणीप्रमाणे पुरवठा करणे

(२) खराब नोटा बदलून देणे, आणि

(३) व्यवहारांसाठी किंवा बदलून देण्यासाठी नाणी व नोटा स्वीकारणे.

(ब) सर्व निर्धारित बँक शाखांनी खराब किंवा वापरण्यास निरुपयोगी नोटा बदलून देण्याची सुविधा उपलब्ध करुन द्यायची आहे. अशा बँकांची नावे आणि पत्ते आरबीआय किंवा संबंधित बँकांकडे उपलब्ध आहेत. शाखांमध्ये उपलब्ध असलेल्या अशा सुविधा सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रसिद्ध कराव्यात.

(क) कोणत्याही बँका शाखेने/कर्मचाऱ्याने त्यांच्या कक्षावर लहान मूल्याची नाणी आणि/किंवा नोटा स्वीकारण्यास नकार देता कामा नये.

**आरबीआय आणि व्यावसायिक बँकामधील करार**

१३ **(अ)** रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व कमर्शियल बँकांदरम्यांनच्या करारात चलन पुरवठा केंद्र (करन्सी चेस्ट) किंवा/व छोटा नाण्यांचा विभाग स्थापन करुन सदर बँकांनी आपल्या शाखा नोटांच्या बदल्यात नाणी स्वीकारतील अशी तरतूद आहे. आपल्या शाखांना पुढील सुचना देण्याविषयी सदर बँकांना सांगण्यात आले आहे.

(१) त्यांनी कोणत्याही नागरिकांकडून देण्यात येणारी कोणत्याही दर्शनीमुल्यांची नाणी, विनाअट स्वीकारावीत आणि त्यांचे मूल्य नोटात प्रदान करावे.

(२) मोठ्या रकमेच्या प्राप्तीसाठी वजनाने नाणी स्वीकारण्यासाठी पूर्वीप्रमाणेच मोजणी यंत्रांचा वापर करावा.

(३) स्वीकारलेल्या नाण्यांमधील रुपयांची नाणी ही रोकड उपयोगिता (चेस्ट बॅलन्स) म्हणून तर, लहान नाणी, छोटया नाण्यांचा संग्रह म्हणून धारण करता येतील.

**(बी)** काऊंटरवर, भरण्यासाठी अगर बदली करुन घेण्यासाठी अशा कोणत्याही कारणासाठी येणारी नाणी स्वीकारण्याच्या सुचना बँकांनी आपल्या शाखांना देण्याच्या आहेत. कमी दर्शनी मुल्याची नाणी ही वजनावर स्वीकारणे सोयीचे होऊ शकेल मात्र, प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये शंभरच्या संख्येत पॅक केलेली नाणीही रोखापाल व ग्राहक या दोघांनाही हाताळणे जास्त सोयीचे होणार आहे. बँकांनी अशा प्लॅस्टिकच्या पिशव्या, ग्राहकांसाठी काऊंटरवर उपलब्ध करुन द्याव्यात. तशा आशयाची सुचना बँकेच्या आवारात दिसेल अशा स्वरुपात लावता येईल. पाच, दहा व वीस पैशांची अल्युमिनियमची नाणी, अल्युमिनियम ब्रॉन्झची व स्टेनलेस स्टीलची दहा पैशांची नाणी, कॉपर निकेलची पंचवीस आणि पन्नास पैशांची नाणी आणि एक रुपयांची नाणी चलनातून काढून टाकण्यात आली असून ती टांकसाळीकडे पाठविण्याची आहेत हे लक्षात घेऊन ग्राहकांना विनंती करण्यात यावी की, नागरिकांनी सदर नाणी वेगवेगळ्या प्लॅस्टीकच्या पिशव्यांमध्ये, शक्यतो शंभरच्या संख्येत जमा करावी. सदर सुचना ही विनंतीवजा असावी, तो आदेश नसावा. अशाच प्रकारची व्यवस्था वापरातील स्टेनलेस स्टीलच्या पंचवीस, पन्नास आणि एक रुपयाच्या नाण्यांसाठी, कॉपर निकेलच्या दोन रुपये व पाच रुपयांच्या नाण्यांसाठी करता येईल. नाण्यांच्या वजनांतील तफावतीमुळे काऊंटिंग मशीनचा या कामासाठी वापर होऊ शकेल.

**(सी)** बँकेच्या शाखांमध्ये नाणी साठविण्यात येणारी अडचण लक्षात घेऊन पाच, दहा व वीस पैशांची अल्युमिनियम नाणी, अल्युमिनियम ब्रॉन्झची व स्टेनलेस स्टीलची दहा पैशांची नाणी, कॉपर निकेलची पंचवीस, पन्नास पैशांची, आणि एक रुपयाची नाणी; मुंबई / कोलकाता / हैद्राबाद येथील शासकीय टांकसाळीकडे पाठविण्यासाठी, त्यांच्याकडे पूर्वसुचना देऊन तिजोरीमधून आणि तुमच्या बँकेतील छोट्या नाण्यांच्या संग्रहातून पाठवून देण्याची प्रचलित पद्धत वापरावी. स्टेनलेस स्टीलची पंचवीस, पन्नास आणि एक रुपयाची, कॉपर निकेलची दोन रुपये व पाच रुपयांची नाणी पुन्हा चलनात आणावीत. मागणी नसल्यामुळे, अशी नाणी तिजोरीच्या साठवण क्षमतेपेक्षा जास्त जमल्यास, क्षेत्रीय कार्यालयातील निर्गम विभागाकडे, नाण्यांच्या वित्तप्रेषणासाठी जाता येईल.

**(ड)** सदर नाणी चलनात बदलून मिळण्याची मागणी करता येईल. या संदर्भात, शाखांकडून पूर्तता होत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी, विभागीय आणि उपविभागीय अधिकाऱ्यांना अचानक भेटी देण्यास व मुख्य कार्यालयाकडे अहवाल सादर करण्यास सांगण्यात यावे. मुख्य कार्यालयामध्ये, सदर अहवालाचे निरिक्षण करुन त्यावर आवश्यक ती कारवाई करण्यात यावी.

**(इ)** या संदर्भातील कसलीही अपूर्तता ही भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्गमित केलेल्या सूचनांचा भंग समजण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**जोडपत्र**

**मुख्य परिपत्रक**

**विषयः महापरिपत्रक – नोटा आणि नाणी बदली करण्याची सुविधा**

**<u>महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची सूची</u>**

| परिपत्रक क्र. | दिनांक | माहिती |
|---|---|---|
| जी-६७/०८.०७.१८/ ९६-९७ | १८.०२.१९९७ | आरबीआय (नोट परतावा) नियम, १९७५, करन्सी चेस्ट ठेवणाऱ्या खाजगी क्षेत्रातील बँकांना पूर्ण अधिकारांचे प्रत्यायोजन |
| जी-५२/०८.०७.१८/ ९६-९७ | ११.१.१९९७ | आरबीआय (एनआर) नियम. सरकारी क्षेत्रातील बँकांना अपात्र नोटांसंबंधी पे/पेड शिक्का मारून - रद्द करण्याचे निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार देणारी योजना. |
| जी-२४/०८.०१.०१/ ९६-९७ | ०३.१२.१९९६ | फाटलेल्या नोटा बदलण्यासाठी स्वीकारणे-उदारीकरण |
| जी-६४/०८.०७.१८/ ९५-९६ | १८.५.१९९६ | आरबीआय (एनआर) नियम सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या चलन पुरवठा शाखांना खराब नोटा बदलण्याचे आणि प्रसिध्दीचे अधिकार. |
| जी-७१/०८.०७.१८/ ९२-९३ | २२.६.१९९३ | आरबीआय (एनआर) नियम सरकारी क्षेत्रातील बॅकांच्या शाखांना सदोष नोटा बदलून देण्याचा पूर्ण अधिकार- प्रसिद्धी |
| जी-८३/सीएल-१ (पीएसबी)- ९१-९२ | ०६.५.१९९२ | आरबीआय (एनआर) नियम सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या चलन शाखांना अपात्र नोटा बदलून देण्याबाबतचे अधिकार |
| जी-७४/सीएल- (पीएसबी) (जनरल) ९०-९१ | ०५.६.१९९१ | आरबीआय (एनआर) नियम- या अंतर्गत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना पूर्ण अधिकार |
| ५.५/सीएल- १ (पीएसबी) - ९०/९१ | २५.९.१९९० | आरबीआय (एनआर) नियम - सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना अधिकार देण्याबाबतची योजना. |
| ८/सीएल - १ (पीएसबी) - / ९०/९१ | १७.८.१९९० | आरबीआय (एनआर) नियम - सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना अधिकार देण्याबाबतची योजना. |
| जी- १२३/सीएल-१ (पीएसबी) (जनरल)- ८९/९० | ०७.५.१९९० | आरबीआय (एनआर) नियम - सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना अधिकार देण्याबाबतची योजना. (दुरुस्ती) |

| | | |
|---|---|---|
| जी-१०८/सीएल-१ (पीएसबी) (जनरल) - ८९/९० | ०३.४.१९९० | आरबीआय (एनआर) नियम १९८९ - रु.५०० मूल्याच्या नोटा - सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या शाखांमध्ये अपात्र नोटा बदलून देणे. |
| जी- ८/सीएल- १ (पीएसबी)- ८९/९० | १२.७.१९८९ | आरबीआय (एनआर) नियम - आरबीआय निर्गम कार्यालयाचा 'टु क्लेम' शिक्का असलेल्या अपात्र नोटां. |
| जी.८४/सीएल.१ (पीएसबी)- ८८/८९ | १७.३.१९८९ | आरबीआय (एनआर) नियम - सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना नोटा बदलून देण्याचे पूर्ण अधिकार. |
| जी.६६/सीएल.१ (पीएसबी)- ८८/८९ | ०९.२.१९८९ | आरबीआय (एनआर) नियम - सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना पूर्ण अधिकार- प्रशिक्षण. |
| एस.१२/सीएल.१ (पीएसबी)- ८८/८९ | ३०.९.१९८९ | आरबीआय (एनआर) नियम - जाणीवपूर्वक खराब केलेल्या नोटा - अभिनिर्णय. |
| जी.१३४/सीएल/१ (पीएसबी)- ८७/८८ | २५.५.१९८८ | आरबीआय (एनआर) नियमांतर्गत पूर्ण अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी योजना राबविणे. |
| १९२/सीएल - १- (पीएसबी)- ८६/८७ | ०२.६.१९८७ | आरबीआय (एनआर) नियम - सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना अधिकार देण्याची योजना. |
| १८९/सीएल.२/८६/८७ | ०२.६.१९८७ | चलनी नोटांवर लिहून किंवा संदेश, घोषणा लिहून त्यांची दर्शनीयता बिघडवणे. |
| १८५/सीएल - १ (पीएसबी) ८६/८७ | २०.५.१९८७ | आरबीआय (एनआर) नियम - खराब नोटांवर 'पे' किंवा ' रिजेक्ट' चा शिक्का मारणे. |
| १७३/सीएल. १ ८५/८६ | ०२.४.१९८५ | खराब नोटा बदलून देण्याचे/त्याची प्रक्रिया या संदर्भात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना पूर्ण अधिकारांचे प्रत्यायोजन. |
| सीवाय नं. १०६४/सीएल. १/ ७६/७७ | ०९.८.१९७६ | खराब नोटा व थोड्या हाताळल्या गेलेल्या नोटा बदलून मिळण्याची नागरिकांना सुविधा. |
| सीवाय नं. ३८६/०८.०७.१३/ २०००-२००१ | १६.११.२००० | रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट परतावा) नियम, १९७५- सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील करन्सी चेस्ट बँकांच्या शाखांना, नोटा बदलून देण्याच्या पूर्ण अधिकाराचे प्रत्यायोजन. |
| जी- ११/०८.०७.१८/ २००१-०२ | ०२.११.२००१ | रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट परतावा) नियम, १९७५- अन्वये सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील करन्सी चेस्ट बँकांच्या शाखांना, नोटा बदलून देण्याच्या |

| | | |
|---|---|---|
| | | अधिकाराचे प्रत्यायोजन. |
| डीसीएम (आरएमएमटी) क्र. ४०४/११.३७.०१/ २००३-०४ | ०९.१०.२००३ | नाण्यांचा स्वीकार व नोटांची उपलब्धता. |
| डीसीएम (एनई) क्र. ३१०/०८.०७.१८/ २००३-०४ | १९.०१.२००४ | नोटा, नाणी आदी बदलून मिळण्याची सुविधा नागरिकांना पुरविणे. |
| डीसीएम (आरएमएमटी) क्र. ११८१ / ११.३७.०१ / २००३-०४ | ०५.०४.२००४ | नाण्यांचा स्वीकार. |
| आरबीआय/२००६-०७ / ३४९/डीसीएम (एनई) क्र.७४८८/०८-०७-१८/ | २५.०४.२००७ | छोट्या मूल्यांच्या चलनी नोटा व नाण्यांचा स्वीकार |